



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com







वर्ष २ रे | अंक : ६८३. वा | बुधवार | दि. १४ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा महसूलमध्ये कुणाचे खेटर अन् कुणाचा पाय...

## कनिष्ठ अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना जुमानत नसल्याचे स्पष्ट

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्याच्या महसूल विभागात सध्या अत्यंत गोंधळाचे वातावरण तसेच गलथानपणा दिसून येत आहे. खरे तर जनतेची विविध प्रकारची कामे करण्यासाठी अधिकाऱ्यांनी काम करण्याऐवजी केवळ भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार येथे होताना दिसून येत आहे. एकीकडे वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारात संरक्षण देत आहेत, तर दुसरीकडे कनिष्ठ अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे ऐकत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सध्या जिल्ह्याच्या महसूल विभागात कुणाचे खेटर अन् कुणाचा पाय अशी स्तिती दिसून येत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचारावर सातत्याने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, बुलढाण्याचे महसूल प्रशासन हे आंधळे, मुके आणि बहिरे देखील झाल्याचे दिसून येत आहे. महसूल विभागात मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप वाढल्याचे दिसत आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने महसूल विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रमाणाच्या बाहेर आणि नियम तोडून सरंक्षण दिले जात आहे. जो अधिकारी कारागृहाच्या गजाच्या आड असायला हवा, तो राजरोसपणे आणि ताठ मानेने उघडपणे भ्रष्टाचार करीत आहे. मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हे आज महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे एक आयकॉन बनले आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी भ्रष्टाचाराचा अक्षरशः उच्चांग गाठला आहे. भ्रष्टाचारातून त्यांनी प्रचंड माया जमवली. त्यातून प्रचंड संपत्ती गोळा केली. परंतु या भ्रष्ट व्यक्तीवर कुठल्याही प्रकारची कारवाई नाही. हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने वृत्तमालिका प्रकाशित करणे व पाठपुरावा सुरू केल्यानंतर मात्र काही प्रमाणात प्रशासनात हालचाली झाल्या. काही प्रमाणात कारवाईसाठी प्रयत्न झाले. परंतु हे प्रयत्न खूपच थातूरमातूर होते. पुढे पुढे तर भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी अधिकाऱ्यांनी सातत्याने कातडीबचाव भूमिका घेतली. जिल्हाधिकारी असोत की उपविभागीय अधिकारी कोणीही कारवाई करीत नसल्याचे पाहून मग थेट अमरावती महसूल आयुक्त कार्यालयापर्यंत महसूल विभागातील भ्रष्टाचाऱ्यांची माहिती पोहोचवण्यात आली. महसूल विभागातून मग दट्ट्या जिल्हाधिकारी कार्यालयाला बसला. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी पुन्हा एकदा कारवाई करण्याऐवजी केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम केले. पूर्वीचे जिल्हाधिकारी तुम्मोड यानीही भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली नव्हती आणि विद्यमान जिल्हाधिकारी देखील कारवाई करण्यास धजावत असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे महसूल आयुक्त कार्यालयातून एक आदेश जिल्हाधिकाऱ्यांना आला. यावर बरेच दिवस काहीही कारवाई झाली नसल्या कारणाने मग चक्क महसूल उपायुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना एक / दोन नव्हे तीन स्मरणपत्र पाठवले. त्या स्मरणपत्रावर देखील जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. या माध्यमातून जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी आपली अकार्यक्षमता सिद्ध केली आहे. दुसरा एक प्रकार म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयातूनही मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांना नियमबाह्य कामे पदाचा गैरवापर व भ्रष्टाचारात साथ देण्यासाठी तत्कालीन





तहसीलदार रुपेश खंडारे यांची चौकशी आणि कारवाईसंदर्भात सांगण्यात आले. मात्र, उपविभागीय अधिकाऱ्यांनीही आपल्या अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे. यावरून हे स्पष्ट आहे की, महसूल विभागातील बरेचसे अधिकारी हे आपल्याच अधिकाऱ्यांची आदेश जुमानत नाहीत. मात्र, न जुमानणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही, तर दुसरीकडे अशाप्रकारे आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कोणतीच कारवाई होत नाही. एकीकडे भ्रष्टाचाराचा आगडोंब उसळलेला आहे, तर दुसरीकडे महसूल विभागात अधिकारीच अधिकाऱ्यांना जुमानेनासे झालेले आहेत. यावरून महसूल विभागात बोकाळलेली अनागोंदी, गलथान कारभार, भ्रष्टाचार किती खोलवर रुजलेला आहे आणि भविष्यात याचे काय गंभीर परिणाम होतील, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भ्रष्टाचाराची ही परिसीमा सुरूच राहिली तर भविष्यात महसूल विभागात जिकडे-तिकडे भ्रष्ट अधिकाऱ्यंचाच बोलबाला असेल, यात काही शंका नाही. या अत्यंत घाणेरड्या स्थितीतून महसूल विभागाला वाचवण्यासाठी जनतेचा एक प्रतिनिधी म्हणून सिटी न्यूज व दैनिक जनसंलचन आपले कार्य चोखपणे बजावत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# पंजाब नॅशनल बँकेच्या व्यवस्थापकास शेतकऱ्याने चाकूने वार करून केले जखमी

**जनसंचलन/ खामगाव**

शेतकरी बचत गटाचे पैसे काढण्यासाठी आलेल्या संस्थेच्या सचिवासोबत झालेल्या शाब्दीक वादातून पंजाब नॅशनल बँकेच्या व्यवस्थापकास धारधार चाकून वार करून गंभीर जखमी केल्याची घटना येथील टॉवर चौकाजवळी पंजाब नॅशनल बँकेच्या शाखेत १३ फेबुवारी रोजी दुपारी उघडकीस आली. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून जखमी बँकेच्या व्यवस्थापकाला उपचारार्थ खाजगी रूग्णालयात भरती करण्यात आले असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तालुक्यातील जळका भडंग येथील संत गजानन शेतकरी स्वयंसहायता बचत गटचे सचिव किरण गायगोळ हे १३ फेब्रुवारी रोजी दुपारी शहरातील टॉवर चौकस्थित पंजाब नॅशनल बँकेच्या शाखेमध्ये संस्थेच्या बचत गट खात्यातून शेतकऱ्यांना द्यावयाचे पैसे काढण्यासाठी आले होते. दरम्यान बँकेचे व्यवस्थापक शंतनू राऊत यांनी किरण गायगोळ यांना पैसे काढण्यासाठी संस्थेच्या प्रोसेडिंग बुकची प्रत आण्यासाठी सांगितले. मात्र आरोपी किरण गायगोळ यांनी मागच्या वेळेस आपण प्रोसेडिंग बुकच्या झेरॉक्स कॉपीवरच पैसे दिले होते असे म्हणाले. मात्र व्यवस्थापकांनी खरी प्रोसेडिंग बुक नक्कल शिवाय पैसे मिळणार नाही असे सांगितल्याने त्यांच्यामध्ये शाब्दीक वाद झाला. अचानक आरोपी किरण गायगोळ याने त्याच्या सोबत आणलेला चाकू खिशातून काढून बँक व्यवस्थापक शंतनू राऊत यांच्या पोटावर वार केले. याव-ेळी सहाय्यक व्यवस्थापक निबांळकर यांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या हातावरही चाकू लागल्याने ते जखमी झाले. बँकेतील कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापकास उपचारार्थ शहरातील खासगी रूग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी घाव घेतली व आरोपी किरण गायगोळ यांना ताब्यात घेवून त्याने वापरलेला चाकूही जप्त केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जनकल्याण हाच भाजपाचा मूलमंत्र गाँव चलो अभियानात दभावासीयांशी मनमोकळा संवाद

**जनसंचलन/बुलढाणा**

गावागावातील सर्वसामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी भाजपाच्या वतीने गाँव चलो अभियान सध्या राबवले जात असून या अभियानाअंतर्गत आपल्या बुलडाणा मतदारसंघात आज मोताळा तालुक्यातील दाभा येथे भाजपा युवा मोर्चा बुलडाणा जिल्हा अध्यक्ष विनायक भाग्यवंत यांनी मुक्कामी भेट देऊन ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधला. मागास भागाचा विकास करणे व यातून जनकल्याण साधणे हाच भाजपाचा मूलमंत्र असल्याचे विचार या वेळी व्यक्त केले. यावेळी भाजपा युवा मोर्चा पदाधिकारी व गावाचा वतीने विनायकभाऊ भाग्यवंत यांची भाजप युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्या बद्दल सत्कार व अभिनंदन केले आजच्या भेटीत विविध समाज घटकांच्या समस्या जाणून घेत केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जनजीवन कसे प्रगत करता येईल याविषयी दाभावासीयांची मते जाणून घेतली. भाजपा युवा मोर्चा चे पदाधिकारी , कार्यकर्ते, शेतकरी, प्रतिष्ठित नागरिक व युवक या अभियानात सहभागी झाले होते.

दाभा येथील गावगाड्यातील पदाधिकारी, महत्त्वाच्या व्यक्ती व समाजघटकांची भेट घेऊन आज संवाद साधला. यावेळी समाधान गूंड, सदानंद हागे,रामराव पव्हणे ,आत्माराम पव्हणे ,दिपक हूंबड ,सतीश राऊत, गजानन तांगडे ,ऋषिकेश तांगडे ,भागवत पव्हणे,शिवा गुंड,राम तांगडे ,ईश्वर हागे ,अंकुश व्यवहारे, प्रमोद हागे, बाळु पव्हणे ,डींगाबर कचोरे ,संजू सुरगडे,



विकास बावस्कर, विष्णू सपकाळ ,किरन हूंबड ,अविनाश पाटील, स्वानंद पव्हणे , गोंवीदा व्यवहारे ,अमोल हागे ,सागर सुरशे ,अविनाश कचोरे , सागर चव्हाण ,विवेक दिंडे,अनिकेत गवळी, मंगेश गाडेकर,अमोल पाटील,संदीप पाटील जाधव,नितीन शेळके, शिवाजी होनाळे,प्रसाद मस्के यांच्यासह भाजपा युवा मोर्चा पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# गाडीतून बॅग चोरताना एकास पकडले, दोन पसार

**जनसंचलन / खामगाव**

चारचाकी गाडीचे चालकाच्या बाजूचे टायर पंक्चर आहे, असे मालकाला सांगत, त्याच वेळी गाडीतील दोन लाख रुपये रकमेची बॅग पळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलाला रंगेहात पकडल्याची घटना सोमवारी दुपारी १:३० वाजता शहरातील रेल्वे स्थानकालगतच्या चहा टपरीसमोर घडली. यावेळी त्याचे दोन साथीदार पळून गेले. शहर पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली. रेल्वे स्थानकालगतच्या चहा टपरीजवळ शहरातील गुलजम्मा शाह (रा. टीचर कॉलनी) यांनी चारचाकी वाहन थांबवून मित्रासोबत बोलत होते. यावेळी एका अल्पवयीन मुलाने त्यांना त्यांच्या गाडीचे चालकाच्या बाजूचे टायर पंक्चर झाल्याचे सांगितले.



त्यामुळे टायर पाहण्यासाठी शाह गेले असता, अल्पवयीन मुलाने वाहनातील २ लाख रुपये असलेली बॅग घेत पळ काढला. ही घटना चहा दुकानातील कामगार वैभव हरमकार व मंगेश हरमकार यांच्या निदर्शनास आली. त्यांनी आरडाओरड केली. त्यामुळे नागरिकांचे लक्ष अल्पवयीन मुलाकडे गेले. त्या मुलाला तत्काळ पकडण्यात आले. त्याच्यासोबत असलेली दोन मुले पळून जाण्यात यशस्वी झाली.

# जय राजे मित्र मंडळ रायपूर कार्यकारिणी निवड...



**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील रायपूर येथे जय राजे मित्र मंडळाची नुकतीच सभा पार पडली. या सभेमध्ये सर्वानुमते मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सहसचिव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्याचबरोबर मंडळाची कार्यकारिणीची निवड करण्यात आली. सविस्तर वृत्त असे की, रायपूर येथे जय राजे मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याही वर्षी जय राजे मित्र मंडळाची तुळजाभवानी मंदिर मंदिरात बैठक पार पडली. या बैठकीमध्ये मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष म्हणून तेजराव मुरडकर तर उपाध्यक्ष म्हणून उमेश सिरसाट यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच सचिव म्हणून पंढरी भोसले तर सहसचिव म्हणून दिपक म्हस्के यांची निवड करण्यात आली. यावेळी गावातील मंडळाचे मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शिवजयंती संदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मंडळाच्या वतीने यावर्षी ऐतिहासिक अशी शिवजयंती निघणार असून यामध्ये पारंपरिक वाद्यांबरोबर मावळे, घोड्यावर शिवछत्रपती, छत्रपती संभाजी महाराज आणि घोड्यावर जिजाऊ त्याचबरोबर तलवारधारी महिला मावळे व पालखी सोहळा, भजन मंडळी, दांडपट्टा, लाठीकाठी, तलवारबाजी, भोवरा खेळणारी मुले आणि मुली असा ऐतिहासिक असा लावा जमा यावेळेस आपल्याला बघायला मिळणार आहे. या अनुषंगाने अतिशय उत्साहात शिवजयंती पार पाडण्याचे ठरले. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्वांनी या दिमाखदार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# व्हॅलेंटाइन डे विरोधात शिवसेना आक्रमक छेड काढल्यास चोप देऊ उपजिल्हा प्रमुख कपिल खेडेकर यांचा इशारा

**जनसंचलन/ चिखली**

सद्यस्थितीत तरुणाईत व्हॅलेंटाइन डे ची तयारी करीत आहे. मात्र, या पाश्चात्य संस्कृतीच्या नावाखाली तरूणी व अल्पवयीन मुलींची छेडखानीचे वाढते प्रकार पाहता शिवसेना पुन्हा एकदा मव्हॅलेंटाइन डेफ्ला विरोध करण्यासाठी सज्ज झाली आहे. खबरदार जर कोणी मुलींची छेड काढली व वाईट हेतूने त्रास दिला तर - जागीच चोप देवू, असा सज्जड दम शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बुलडाणा उपजिल्हा प्रमुख कपिल खेडेकर यांनी दिला. १४ फेब्रुवारीला जगभरात मव्हॅलेंटाइन डे साजरा केला जातो. अनेकजण आपल्या प्रेमाची कबुली देण्यासाठी तर प्रेमी युगुल हा दिवस एकत्र घालवत नातं घट्ट करण्यासाठी एकमेकांना भेटत असतात. मात्र, या पाश्चात्य संस्कृतीमुळे मुली व तरूणींच्या छेडखानीचे प्रकार वाढले आहेत. शहरात शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, कॉफी शॉप, बसस्थानक आदी परिसरात अनेक भामटे मुलींच्या मागावर असतात. टीगळ टवाळी करणे, शेरेबाजी करणे आदी प्रकार वाढीस लागले आहेत. अनेकवेळा टवाळखोरांच्या त्रासाला कंटाळून विद्यार्थीनींचे शैक्षणिक नुकसान होते. सोबतच बदनामीच्या भितीने कुठे त्या वाच्यता करत नाही, दरम्यान, शिवसेनेचा पूर्वीपासूनच व्हॅलेनटाईन डे ला विरोध आहे. यापृष्ठभूमीवर उपजिल्हा प्रमुख कपिल खेडेकर यांनी जिल्ह्यात व चिखलीत कुठेही जर व्हॅलेंटाइन डे च्या दिवशी कोणी एकत्र दिसले, तर त्याने मार खायला तयार राहावे, असा इशारा दिला आहे, व्हॅलेंटाइन डे भारतीय संस्कृतीच्या विरोधात आहे. आम्ही आमच्या संस्कृतीचा अशाप्रकारे नाश होताना पाहू शकत नाही. या दिवशी काहीजण तरुणींचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. असे लोक तरूणींना आपल्या जाळ्यात ओढून अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न करतात.



त्यामुळे या दिवशी शहरात ठिकठिकाणी शिवसैनिकांना तैनात करण्यात येणार आहे, तथापि यापुढेही छेडखानी विरोधात शिवसेना भक्कमपणे तरुणी व त्यांच्या पालकांच्या पाठीशी उभे राहणार असून पालकांनी अशा प्रकाराला वेळीच आळा घालण्यासाठी निसंकोचपणे शिवसैनिकांशी संपर्क साधावा, त्यांचे नाव गुप्त ठेवण्यासह संबंधीत रोडरोमीयोंचा योग्य बंदोबस्त करण्याचे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बुलडाणा उपजिल्हा प्रमुख कपिल खेडेकर यांनी केले आहे. सोबतच जो कोणी व्हॅलेंटाइन डे साजरा करेल, त्याला चोप देण्यात येईल, अशी खुली धमकीच शिवसेनेने दिली आहे

# प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी एस.टी. कामगारांचे विभागीय कार्यालयासमोर उपोषण!

**जनसंचलन/ बुलडाणा**

वेतन वाढीसह अन्य प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी एस. टी. कामगार संगटनेने आज १३ फेब्रुवारीला बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. येथील मलकापूर रोडवरील विभागीय कार्यालयासमोर कामगार उपोषणास बसले आहेत. परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांना सातवे वेतन लागू करावे, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी मिळावी,सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याच्या अडचणी दूर करा, अशा प्रकारच्या अनेक आर्थिक मागण्या संगटनेने मांडल्या आहेत. शासनाने सर्व मागण्यांसंदर्भात




सकारात्मक विचार करावा असे कामगार कर्मचाऱ्यांनी सांगितले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्रामपंचायत कार्यालय मेरा बुद्रुक व गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबिर संपन्न...

## परिसरातील शेकडो रुग्णांनी घेतला लाभ








**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालय मेरा बुद्रुक व गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ ग्रामपंचायत मेरा बुद्रुकला तीन वर्षे कार्यकाळ पूर्ण झाला यानिमित्ताचे अवचित्य साधून भव्य आरोग्य शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या भव्य आरोग्य शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेरा बुद्रुक गावचे सामाजिक कार्यकर्ते परशुअण्णा पडघान हे होते तर, उद्घाटक डॉ.रिंगे हे होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक चिखली तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रिंगे होते. या भव्य आरोग्य शिबिराचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बुलढाणा उपाध्यक्ष गजानन वायाळ हे होते. या अगोदरही गजानन वायाळ यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी वृंद यांच्या अनमोल सहकार्याने वेगवेगळ्या प्रकारचे ग्रामपंचायतच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. परंतु या भव्य आरोग्य शिबिरामध्ये मोफत ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी, मुतखडास, मूत्रपिंडातील खडे, प्रोस्टेट ,पित्ताशय खडा, स्वादुपिंड, छोट्या गाठी ,मुळव्याध, हायड्रोसिल, अंडाशय शस्त्रक्रिया, भगंदर पित्ताशयाचे खडे पायातील शिरा फुटणे मूत्रपिंडाचे आजार पोट व आतड्यांच्या शस्त्रक्रिया कर्करोग निदान, बालरोग शस्त्रक्रिया, मेंदू मनका फक्चर, नाक ,कान, घसा शस्त्रक्रिया, नेत्रालय ,हृदयरोग, जनरल मेडिसिन, गर्भपिशवी ,अस्थिरोग, मानसोपचार इत्यादी रोगावर तपासणी व मार्गदर्शन मोफत करण्यात आले. सर्वसाधारणपणे कोणत्याही आजाराचे लवकर निदान झाले तर त्यावर उपचारही लवकर होतात व त्या रोगापासून मुक्तता मिळते नव्हे तर रोग संपूर्णपणे बरा होतो त्यासाठी प्राथमिक तपासण्या करणे गरजेचे असते. रोगाचे लवकर निदान नाही झाले तर इलाजही लवकर होत नाही कालांतराने रोगप्रतिकार शक्ती कमी होऊन तो आजार बळकावतो व वेळप्रसंगी मृत्यूही होऊ शकतो. त्यासाठी आरोग्याच्या शरीराच्या वेगवेगळ्या प्राथमिक तपासण्या करणे गरजेचे असते. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी राष्ट्रवादीचे नेते तथा बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष गजानन वायाळ यांनी या भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये उपसरपंच दिनकर डोंगरदिवे, शिवसेना नेते राजू पाटील, परशुअण्णा पडघान, सत्तार पटेल, ग्रामपंचायत सदस्य सागर पाटील, ग्रामपंचायत सचिव प्रदीप साळवे, प्रभाकर गायकवाड यांचे सुद्धा मार्गदर्शन लाभले. या भव्य अशा आरोग्य तपासणी शिबिरासाठी अंत्रि खेडेकर व मेरा बुद्रुक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील सर्व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी सुद्धा सहभाग घेतला होता. भव्य अशा या आरोग्य शिबिराचा शेकडो गरजू रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी मोफत औषधी वितरण सुद्धा करण्यात आले. ज्या रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे किंवा अधिकच्या तपासण्या करण्याची गरज आहे त्यांच्यासाठी गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या मार्फत मोफत शस्त्रक्रिया व तपासणी होणार आहे. आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी वृद्ध व ग्रामस्थ मंडळी तथा ग्रामपंचायत कर्मचारी सखाराम खर्डे, मुबारक शहा, संदीप चेके,रवि जाधव ,संदेश चव्हाण ,बाबू तोडे ,अश्विन अंभोरे, राहुल हिवाळे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात माजी सैनिकांची पदभरती

**जनसंचलन/बुलढाणा**




जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील गट-क ची सरळ सेवेची पदे फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून भरण्यात येत आहे. यासाठी दि. ३ मार्च पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे लागणार आहे. या पदभरती मध्ये कल्याण संघटक ४० पदे, वसतिगृह अधीक्षक १७ पद, कवायत प्रशिक्षक १ पद, शारीरिक प्रशिक्षण निदेशक १ पद, वसतिगृह अधिक्षिका ३ पदे, वसतिगृह अधिक्षिका गट क ३ पदे भरण्यात येणार आहे. या पदाकरीता सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नींना प्राधान्य देण्यात येणार आहे. उपलब्धता नसल्यास सेवा प्रवेश नियमांच्या अटींची पुर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नी या उमेदवारांकडून वसतिगृह अधिक्षिका गट-क पदाकरिता अर्ज करू शकतील. या पदांपैकी १ पद हे अपंग संवर्गातून किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारांमधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता, उपलब्धतेनुसार भरण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन यांच्यामार्फत होणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येतील. पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड ऑनलाईन अज mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर येथे दि. १२ फेब्रवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दि. ३ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व पात्र माजी सैनिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी रूपाली सरोदे यांनी केले आहे.

# सुवर्णयशासोबत महाराष्ट्र टीमची राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**जनसंचलन/बुलडाणा**




शालेय क्रीडा व विकास संस्थांकडून दि.८ ते ११ फेब्रुवारी दिल्ली येथे आयोजित झालेल्या दिल्ली नॅशनल गेम्स २०२४ मध्ये बुलडाणा येथील काही विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यात वय वर्षे १४,१७,१९ व सिनियर या गटात बुलडाणा जिल्ह्याच्या विद्यार्थ्यांचा जास्त सहभाग असून त्यात ३१ सुवर्णपदक,४ रजतपदक प्राप्त झाले तर त्यात विनायक राऊत,गौरव दिलीप रायलकर,आयुष्य वाघमारे, अभय सुरडकर,विवेक शेळके, उमेश राठोड,ज्ञानेश्वरी कोल्हे,गणेश भुसारी,वैष्णवी चव्हाण, अनिरुद्ध काकडे,प्रथमेश नारखेदे,पियुष चोटमोल, पियुष चव्हाण,रोहित रिठे,प्रतीक सावळे,आदर्श पारवे,निशांत घुले,तेजस खरात,श्रुती थोरात,साक्षी दळवी,अक्षरा राठोड,आकांशा वानखेडे, सृष्टी बहेकार,राजर्षी कापसे,प्रिया गाढवे,वैष्णवी शिंदे,जान्हवी शिंदे,सुमित बर्डे,तुषार बर्डे,ऋषिकेश सोळंके,पंकज शेळके यांना सुवर्णपदक तर वैदेही बहेकार,ओजस बहेकार,चैतन्य बेबेकर,कल्याणी राठोड यांना रजतपदक इंडियन फॉरमेर शूटिंग टीम चे खेळाडू शिवम ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना महाराष्ट्र राज्याचे विशेष आभार मानले व खेळाडूंनी आपल्या सुधृढ मनाचा व सर्वांगीण शरीर विकासाचा विचार करत खेळ तसेच संस्कृती जपण्याचा उद्देश सांगितला तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपले पालक तसेच त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत असलेल्या मुख्य प्रशिक्षक सुनील तळेकर सर, प्रशिक्षक भूषण सिरसाट,सुहास राऊत तसेच महाराष्ट्र राज्य तायक्वांदो असोसिएशन चे महासचिव शिवाजीराव चव्हाण सर तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी बाळकृष्ण महानकर सर,क्रीडा अधिकारी रवींद्र धाडपवार सर,राज्यक्रीडा मार्गदर्शक अनिल इंगळे सर तसेच शिवसंकल्प शिवकालीन मर्दानी खेळ पथक तसेच ऑल मार्शल आर्ट क्लब च्या पदाधिकाऱ्यांना दिले.

# शेतकऱ्यांना ई-केवायसी, आधार जोडणी करण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ई-केवायसी, आधार जोडणी करावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दि. २१ फेब्रुवारी २०२४ पूर्वी प्राधान्याने ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील २ हजार ७०४ शेतकऱ्यांची ई-केवायसी आणि ८ हजार ३२६ शेतकऱ्यांचे आधार लिंकींग प्रलंबित आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी सीएससी केंद्रामार्फत ई-केवायसी करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँकेमध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार सीडींग करण्याचे काम दि. २१ फेब्रुवारी २०२४ पूर्वी पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे. ही प्रक्रिया प्रलंबित असल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहू शकतो. त्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी व आधार लिंकींग करणे आवश्यक आहे.



आधार लिंकींग अभावी लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे जाहीर आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# सिंहगड एक्सप्रेसमधून मुलीच्या अपहरणाचा डाव सहायक पोलीस निरीक्षक श्री. बलभीम ननवरे यांच्या सतर्कतेमुळे विफल ;उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून शाबासकी !

वृत्तसंस्था/मुंबई

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे महाराष्ट्र पोलीस दलाचे ब्रीद आपल्या कर्तव्यबुद्धीने जपणारे सहायक पोलीस निरीक्षक श्री. बलभीम ननवरे यांचा आज महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनातील त्यांच्या दालनात पुष्पगुच्छ, शाल आणि अभिनंदन पत्र देवून सन्मान केला, ०८ फेब्रुवारी रोजी सिंहगड एक्सप्रेसने पुण्याला कोर्ट कामासाठी जात असताना त्यांना रेल्वेच्या डब्यात ३० वर्षीय इसम ०८ वर्षीय मुलीला घेऊन प्रवास करीत असताना दिसला, अखंड सावधचित्त असणे हा पोलीसी संस्कार अंगी बाणवलेल्या श्री. ननवरे यांच्या नजरेतून या ३० वर्षीय इसमाच्या संशयास्पद हालचाली सुटल्या नाहीत, मुलगी मराठीमध्ये बोलत होती तो इसम हिंदी मधून बोलत होता, ननवरे यांनी आपल्या पोलीस स्टाईलने उभयतांशी संवाद साधत माहिती घेण्यास सुरुवात केली. एकदा तो ३० वर्षीय इसम म्हणजे दयानंदकुमार शर्मा (बिहार) ही आपली मुलगी असे सांगायचा तर कधी ही आपली बहीण आहे असे सांगायचा. मुलीला आपल्या मामाचा मोबाईल क्र. तोंडपाठ असल्याने श्री. ननवरे यांचे काम सोपे झाले, त्यांनी तात्काळ मुलगीचे मामा श्री. सचिन शेलार यांच्याशी संपर्क साधला. मामानी आपल्या बहिणोशी संपर्क साधून माहिती घेतली आणि श्री. ननवरे यांना आपली भाची पळवून नेली जात असल्याचे तात्काळ कळविले, मामांना पुणे स्टेशनवर बोलवण्यात आले आणि आरोपी शर्मा यांचा मुलीस पळवून नेण्याचा डाव सतर्कतेमुळे उधळला गेला. श्री. ननवरे यांनी सावधानता बाळगली नसती तर आरोपो शर्मा यांचे दुष्ट हेतू पूर्ण झाले असते. महिला जागृती आणि सबलीकरणासंदर्भात सदैव कार्यमग्न असणा-या विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या कानावर श्री. ननवरे यांचे प्रसंगावधान आणि त्यामुळे मुलीचे टळलेले अपहरणाबाबतची हो घटना जाताच त्यांनो या कामगिरीबद्दल त्यांना विधानभवनातील आपल्या दालनात निमंत्रित केले आणि त्यांचा सन्मान केला, तसेच याबाबत डॉ, गोऱ्हे



यांनी श्री, ननवरे यांनी केलेल्या सन्माननीय कामाबाबत लेखी अभिनंदनाचे पत्र ही लिहीले. यावेळी डॉ. गो-हे यांनी आपल्या मुलांबाबत पालकांनी जागरुक रहावे व अनोळखी व्यक्तीसोबत त्यांना शाळेत अथवा घराबाहेर पाठवू नये असे आवाहनही केले आहे. सहायक पोलीस निरीक्षक श्री. बलभीम ननवरे यांचे या उल्लेखनीय सतर्कतेबद्दल समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# परिवर्तन रथयात्रेची खरबडीतील सभा गाजली

## १५ तारखेपासून शेगाव तालुक्यात विकासाचा घोष अन परिवर्तनाचा जागर



जनसंचलन/बुलडाणा

अल्पकाळातच जिल्ह्याचे उद्याचे नेतृत्व ठरलेले वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या परिवर्तन रथयात्रेने १३ फेब्रुवारी रोजी मोताळा तालुक्याचा निरोप घेतला. राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेणारी आणि प्रचंड गाजलेली ही रथयात्रा १५ फेब्रुवारी पासून शेगाव तालुक्यात प्रवेश करणार आहे. दरम्यान मंगळवारी सायंकाळी मोताळा तालुक्यातील खरबडी येथे दणदणीत समारोपीय सभा झाली. ही सभा चांगलीच गाजली. १० फेब्रुवारीला मोताळा तालुक्यातील नळकुंड या आदिवासी बहुल गावातून यात्रेचा प्रारंभ झाला. पहिल्याच सभेत बोलताना या युवा नेत्याने जिल्ह्याच्या विकासाची तळमळ, व्हिजन व आक्रमकता याचे दर्शन घडविले. यामुळे शुभारंभ एकदम दणकेबाज झाला. आपल्या विकासाच्या संकल्पना मांडल्यावर त्यांनी जिल्ह्यातील नेत्यांच्या दादागिरीचे जाहीर पोस्टमार्टेम केले! मला जिल्ह्यातून गुंडाराज व कमिशनराज तडीपार करायचे असून त्यासाठी जनता जनार्दन व मतदारांची समर्थ साथ हवी, असे आवाहन करीत त्यांनी नळकुंडच नव्हे तर संपूर्ण जिल्हा दणाणून सोडला. १० फेब्रुवारीला नळकुंड येथून निघालेली ही सुसाट यात्रा उबाळखेड, रोहिणखेड, थळ, काळेगाव, फर्दापूर, वडगाव(ख), हनवतखेड, काबरखेड, चावर्दा, पोफळी, वाडी, रिधोरा या गावांत मजल दरमजल करीत पोहोचली. मुक्कामाचे ठिकाण असलेल्या धामणगाव बढे येथील सभा संदीप शेळकेंचे जंगी शक्ती प्रदर्शन ठरले. तुम्ही बदल घडवा, मी जिल्हा घडवितो, असा संदेश देत निघालेली यात्रा १३ फेब्रुवारीला बोराखेडी, परडा, शिरवा, तरोडा, पिंपळगाव नाथ, गिलोरी, जयपूर, आडविहिर , तिग्रा, वरूड येथे पोहचली. सायंकाळी खरबडी येथे दणदणीत सभेने मोताळा तालुक्यातील परिवर्तन यात्रेचा समारोप झाला.

# रविकांत तुपकरांचा १५ फेब्रु.ला गर्दे सभागृहात निर्धार मेळावा...

जनसंचलन/बुलढाणा

येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रविकांत तुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वा. गर्दे सभागृहात निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तर याच दिवशी रविकांत तुपकर यांच्या जामीनावरचा निकाल देखील जिल्हा सत्र न्यायालयात घोषित केला जाणार आहे. एकीकडे न्यायालयाच्या निकालाची उत्सुकता लागून आहे तर दुसरीकडे या निर्धार मेळाव्यात रविकांत तुपकर काय घोषणा करतात



याकडे देखील सर्वांचे लक्ष लागून आहे. त्यामुळे १५ फेब्रुवारीला नेमक्या काय घडामोडी घडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# युवकास दोन अज्ञातांनी लाकडी तराफ्याने केली मारहाण

जनसंचलन/ खामगाव



रस्त्यावर उभ्या असलेल्या युवकास दोन अज्ञातांनी लाकडी तराफ्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना गारडगाव फाट्यावर घडली. एका बँकेच्या वसुलीचे काम करणारा प्रशांत खंडाळकर हा सोमवारी दुपारी गारडगाव फाट्यावर उभा होता. यावेळी दोन अज्ञात व्यक्ती त्या ठिकाणी आले. त्यांनी येथे उभा का आहेस, असे म्हणून त्यांनी त्याच्याशी वाद घातला. त्याला लाकडी तराफ्याने डोक्यात मारून जखमी केले. याबाबत प्रशांतचा भाऊ स्वप्नील खंडाळकर यांनी खामगाव ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली. यावरून पोलिसांनी दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# युवतीची छेडखानी करणाऱ्या ड्रायव्हिंग स्कूल चालकास महिलांनी बदडल

जनसंचलन/ शेगाव

शेगाव फोर व्हीलर गाडीची ड्रायव्हिंग शिकण्यासाठी गेलेल्या एका युवतीची ड्रायव्हिंग स्कूल चालकाने छेडखानी केल्याने सदर युवतीसह तिच्या नातेवाईकांनी त्याला यथेच्छ बदडले. चप्पलांचा हार त्याचे गळ्यात टाकून भर चौकात आणून धिंड काढली. एवढ्यावरच ना थांबता पोलीस स्टेशनमध्ये आणून त्या विरोधात तक्रार सुद्धा दाखल केली. मात्र काहींनी मध्यस्थी केल्यावर सदर प्रकरण आपसात घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र यात अपयश आले अखेर १० दिवसांनी पीडित युवतीच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना स्थानिक जगदंबा नगर मधील श्री गुरुदेव ड्रायव्हींग स्कुलमध्ये ३ फेब्रुवारी रोजी घडली. शहरातील जगदंबा नगर स्थित ज्ञानेश्वर कुकडे यांच्या श्री गुरुदेव मोटर ड्रायव्हिंग स्कूलमध्ये शहरातील जिजामाता नगरमध्ये राहणारी एका युवतीने फोर व्हीलरचे ड्रायव्हिंग शिकण्याकरिता क्लास लावला होता. तिला स्कूलच्या चालकाने ज्ञानेश्वर कुकडे यांनी त्यांच्याकडे असलेली होंडाई कंपनीची फोर व्हीलर गाडी शिकवत असताना जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होता. वाईट उद्देशाने नको त्या ठिकाणी विनयभंग करत असे. त्याला सदर युवतीने समजावून सांगितले. मात्र तो ऐकत नव्हता ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता सदर युवती ड्रायव्हिंग क्लास समोरून जात असताना त्याने तिचा पाठलाग व हातवारे केले. नको त्या ठिकाणी स्पर्श केला व तु मला आवडतेस असे सांगत विनयभंग केला. अशी तक्रार पीडित युवतीने पो स्टे शेगाव शहर येथे दिली वरून पोलिसांनी १३ फेब्रुवारी रोजी आरोपी ज्ञानेश्वर विठल कुकडे यांचे विरुद्ध कलम ३५४अ, ३५४ड, ५०९ भांदवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॉ. संजय करूटले करत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958